सकाळ

# चाचडगाव विद्यालयात आरोग्य शिबिर

दिंडोरी : चाचडगाव जनता सेवा मंडळ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात प्राचार्य मधुकर आहेर यांच्या मार्गदर्शनाने स्वप्नपूर्ती एज्युकेशनल अ‍ॅन्ड सोशल वेल्फेअर सोसायटी नाशिक संस्थेतर्फे मोफत दंत वैद्यकीय तपासणी शिबिर घेण्यात आले. या वेळी सोसायटीच्या अध्यक्षा डॉ. अनुराधा गाडेकर व त्यांच्या टिमने मुला-मुलींची दंत तपासणी करून वैयक्तिक आरोग्यविषयी मार्गदर्शन केले. या वेळी दिनेश देवरे, दत्तात्रय निकम, राजेंद्र देशमुख, देवीदास पाटील, पुरुषोत्तम पाटील, अरुंधती पाटील, खेमचंद पाटील, योगेश्वर ठाकरे, वैशाली निकम, किसन जाधव, संजय पवळे, हेमंत बागूल, प्रभाकर सोनवणे उपस्थित होते.

Nashik, Sinnar
29/07/2018 Page No. 4

Scanned with Oken Scanner